


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १६५ ●रविवार, दि. १४ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# पत्नीची निर्घृण हत्या करून पती फरार

**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी घटनांना अंजाम देणाऱ्या नतदृष्ट पैदाशिंचा नंगानाच एकीकडेच सुरूच असतांना दुसरीकडे संसारीक वादातून खून, आत्महत्या सारख्या घटना जिल्ह्यात सातत्याने घडत आहेत. रात्री घराच्याबाहेर असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये झोपलेल्या पत्नीच्या पोटात थेट भाला सदृष्य हत्याराने वार करून तिची हत्या केली आणि पती घटनास्थळावरून फरार झाला. ही खळबळजनक खुनाची घटना परळी तालुक्यातील डाबी गावातील एका शेतात घडल्याने या भागात प्रचंड खळबळ उडाली आहे.



या खळबळजनक घटनेची अधिक माहिती अशी की, परळी तालुक्यातील डाबी येथील तुकाराम मुंडे हा आपल्या कुटूंबासमवेत शेतात राहत होता. रात्री त्यांच्या कुटूंबियांचे जेवण झाले. त्यानंतर दोन मुलांना तुकाराम मुंडे याने घरामध्ये झोपवले तर स्वत... आणि त्याची बायको शोभा मुंडे हे दोघे घराच्या बाहेरील पत्र्याच्या शेडमध्ये झोपले. आज सकाळी त्यांच्या मुलांनी दार उघडले तेव्हा त्यांची आई रे ाच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आल्याने त्यांनी मोठ्याने आरडाओरड केली. तेव्हा अन्य लोक घटनास्थळी जमा झाले. त्यांनी या घटनेची माहिती तात्काळ पोलिसांना दिली. परळी ग्रामीण पोलीस घटनेची गांभीर्य पाहून घटनास्थळावर गेले तेव्हा महिलेच्या पोटात भाल्यासारख्या शस्त्राने पोटात वार केल्याचे आणि मारहाण केल्याचे दिसून आले. ज्या हत्याराने शोभा मुंडे यांना मारण्यात आले ते त्या ठिकाणीच होते. त्या दोघांमध्ये नेमके रात्री काय झाले. तुकाराम ने शोभा हिची हत्या का केली ? हे प्रश्न अद्याप गुलदस्त्यात असून पोलिसांनी मृतदेहा ताब्यात घेत परळी रूग्णालयामध्ये शवविच्छेदनासाठी आणला आहे. तर हत्या केल्यानंतर तुकाराम मुंडे मोटारसायकल घेवून अज्ञान स्थळी फरार झाल्याचे सांगण्यात येते. सदरच्या खुनाच्या घटनेने परळी तालुक्यात खळबळ उडाली आहे.

## मराठा आरक्षणाबाबत सरकारसमोर मोठं आव्हान... कोर्टात या गोष्टी सिद्ध कराव्या लागणार; आजचा युक्तिवाद कशावर?

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाबाबत सरकारसमोर मोठं आव्हान... कोर्टात या गोष्टी सिद्ध करा तर मराठा सामाजासाठी एसईबीसीचा जो मध्यममार्ग सरकारने शोधला होता. त्याचावर वक्रदृष्टी फिरली आहे. १० टक्के आरक्षणावरून मुद्यांची भाषा सुरू आहे. तर मुंबई उच्च न्यायालयात मुद्यांची लढाई सुरू झाली आहे. दस्तूरखुद्द पूर्णपीठानेच आता मराठ्यांना कोणत्या आरक्षणाचा लाभ द्यायचा



असा सवाल राज्य सरकारला केला. त्यामुळे राज्य सरकारसम ोरील न्यायालयीन लढाई सोप्पी नसेल हे तर अधोरेखित झाले आहे. मराठ्यांना खरं तर ओबीसीतून आरक्षण हवं आहे. अर्थात कायद्याच्या परिभाषेत ज्याच्याकडे कुणबी नोंदी त्याला ओबीसी प्रम ाणपत्र, असं स्पष्ट गणित मांडण्यात आलं आहे. सरकारचा सध्याचा जीआरही त्याला अनुकूल आहेत. मराठ्यांनी या लढ्यात मोठा पल्ला गाठला ▶▶ उर्वरित पान २ वर

## सावधान महाराष्ट्र! पुढील दोन दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार, काही भागात अतिवृष्टीचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठं पाऊस तर कुठं उघडीप झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, गेल्या चार ते पाच दिवसांपासून राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. तर काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. यामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. शेती पिकांना देखील फटका बसला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस




राज्यात कसं असेल हवामान याबाबतची माहिती ज्येष्ठ हवाम ान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. अतिजोरदार पावसाची शक्यता: मान्सूनच्या सक्रियतेनंतर आजपासुन सुरु होणाऱ्या संपूर्ण आठवड्यात म्हणजे गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर पर्यन्त महाराष्ट्रात मध्यम ते

▶▶ उर्वरित पान २ वर

## आधी लाठ्या काठ्याने मारहाण नंतर फरफटत नेत केले अपहरण

### पोलिसांनी अपहरणकत्यारच्या मुसक्या बांधल्या, अपहरण झालेल्याची सुटका

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील गोरे वस्ती परिसरात एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागनाथ नन्नवरे यांना दहा ते बारा जणांच्या टोळक्याने लाठ्या-काठ्यांनी अमानुष मारहाण करून नंतर एका चारचाकी वाहनात जबरदस्तीने अपहरण करण्यात आले आहे. ही घटना संपूर्णपणे मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली असून परिसरात व्हिडीओ क्लिप मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.



सदरच्या घटनेने प्रशासनातही खळबळ उडाली. त्यांनीतात्काळ या प्रकरणीच दखल घेत यातील आरोपीतांना भूम तालुक्यातून ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. अपहरण झालेल्या नागनाथ नन्नवरे याचीही सुटका करण्यात आली आहे. सदरचा प्रकार का घडला याचा तपास पोलीस करत आहेत. बीड शहरानजीक असलेल्या गोरे वस्ती परिसरातून

▶▶ उर्वरित पान २ वर

## जुनी पोलीस लाईन गरदुले, गंजेटी, बेवड्यांच्या विळख्यात; पडीक पडल्याने अनेकजण कचराही टाकू लागले




**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या बाजुला आणि पोलीस अधिक्षकांच्या रेस्ट हाऊससमोर असलेल्या पोलीस कॉलनीची दुर्दशा मोठ्या प्रमाणावर होतांना दिसून येत आहे. मोडकळीस आलेले वॉल कंपाऊंड आणि त्याठिकाणी कोणीही राहत नसल्याने संपूर्ण शहराची घाण आता तेथे आणून टाकली जात आहे. त्यामुळे या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून शेजारीच रूग्णालय आणि लोक राहत असल्याने त्या रोगराईचा परिणाम सर्व सामान्यांसह रूग्णावर होवू लागला आहे. त्यामुळे सदरच्या पोलीस लाईनच्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधण्यात यावा किंवा जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पोलिसांच्या या जागेचा चांगला उपयोग करण्याहेतू या ठिकाणी तात्पुरते गार्डन अथवा सुसज्ज मैदान तरी करावे अशी मागणी होत आहे.जिल्हा रूग्णालयाला अगदी खेटून जुनी पोलीस लाईन आहे. या ठिकाणी पोलिसांसाठी घरे बांधलेली होती. त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी राहतही होते. मात्र येथील बिल्डींग मोडकळीस आल्या आणि तेथून सर्व कर्मचारी अन्यत्र गेले. सदरची पोलीस लाईनची जागा ही मोठी आहे. तिचा वॉल कंपाऊंडही अनेक ठिकाणी पडलेल्या अवस्थेत आहे. लपण्यासाठी जागा आहे. त्यामुळी काही गर्दुले, गंजेटी आणि बेवडे या रिकाम्या जागेत येवून बसतात. त्याच बरोबर शहरातील अनेकजण या ठिकाणी कचराही टाकू लागले आहेत. शेजारीच रूग्णालय आणि मध्य वस्ती असल्याने रोगराई वाढण्याचीही शक्यता आहे. या समोर जिल्हा पोलीस अधिक्षकांचे रेस्ट हाईस आहे. सदरच्या जागेचा सदउपयोग करण्याहेतू जिल्हा पोलीस अधिक्षकांनी तेथील साफसफाई आणि कंपाऊंडवॉलची बांधणी करून त्या जागेत कोणी कचरा टाकणार नाही, दारूडे, गंजेटी, बेवड्यांसाठी ती जागा उपलब्ध होणार नाही. यासाठी दक्षता घ्यावी अशी मागणी या भागातून होत आहे.

## हृदयद्रावक... सरकार जात प्रमाणपत्र देईना, पित्याने करंटला धरुन जीव संपवला

**लातूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील दादगी गावात धक्कादायक घटना घडली आहे. शिवाजी वाल्मिक मेळ्ळे (३२) या तरुणाने जात प्रमाणपत्र न मिळाल्यामुळं आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. आज संध्याकाळी त्यांनी विजेच्या करंटाचा धक्का घेत जीवन संपवले आहे. मेळ्ळे यांनी वर्षभरापूर्वी मुलांसाठी महादेव कोळी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, प्रमाणपत्र न मि ळाल्याने मुलांना शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा मिळत नव्हत्या. कुटुंबाची जबाबदारी आणि




मानसिक तणाव यामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे.

### सुसाईड नोटमध्ये काय?

माझे दोन लेकर शिकायला आहेत. मी मजुरी करून घर चालवत आहे.. लेकराला महादेव कोळ्याचं प्रमाणपत्र मिळत नाही. हे सरकार प्रमाणपत्र देत नाही. म्हणून मी करंटला धरून जीवन संपवतोय असा उल्लेख सुसाईड नोटमध्ये केला आहे. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत असून, कोळी महादेव समाजाचे प्रमाणपत्र न मिळाल्याने होणाऱ्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराई पोलिस उपअधिक्षकपदाचा अनिल कटके यांनी स्विकारला पदभार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई उपविभागीय पोलिस उपअधिक्षक म्हणून अनिल बबन कटके यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला. पंधरा दिवसांपूर्वी त्यांच्या नियुक्तीचा आदेश निघाला होता. त्यांच्या आगमनामुळे तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्ये होत आहे. विशेषत... अवैध वाळू वाहतूक रोखणे, गुन्हेगारीवर नियंत्रण आणणे व सामाजिक सलोखा राखणे या महत्त्वाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असणार आहे. अनिल कटके यांचा पोलिस सेवेतला अनुभव उल्लेखनीय आहे.



यापूर्वी ते अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव गुन्हे शाखेत पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. काटेकोर तपास, प्रामाणिकपणा व कठोर शिस्त या त्यांच्या कार्यशैलीमुळे त्यांनी गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणले होते.

▶▶ उर्वरित पान २ वर



नोंदणी क्र.ए-९६२ (बीड)

**श्री. खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्ट, बीड**

✻ अध्यक्ष ✻

श्री. अभिजीत(राणा) रणजितसिंह चौव्हाण

मो.९४२२२४२७५०/९३०३९४९४९४

जा.क्र.०७/२०२५ दिनांक: १३/०९/२०२५

**श्री. खंडेश्वरी देवी नवरात्र महोत्सव सन २०२५-२६**

दिनांक २२.०९.२०२५ ते दि. ०२.१०.२०२५ या कालावधीत श्री.खंडेश्वरी नवरात्र महोत्सवानिमित्त स्टॉल धारकांसाठी जागा वाटप कार्यक्रम खालीलप्रमाणे राहिल.

**दि. १६.०९.२०२५ रोजी वार मंगळवार सकाळी ठिक ११-०० वाजता**
**फुलवाले, झेंडीवाले, पेढेवाले, कटलरी व ज्वेलरी इत्यादी.**
**दि. १७.०९.२०२५ रोजी वार बुधवार सकाळी ठिक ११-०० वाजता**
**आईस्क्रीम, वडापाव, पावभाजी, हॉटेल, पानटपरी, भोई इत्यादी व्यवसाईक.**

**टीप:-** १) जागा वाटप त्याच दिवशी दिलेल्या वेळेतच होईल. जागेचा बांधकाम निधी घेऊन ताबा त्याचवेळी देण्यात येईल. जागा सर्व धर्मियासाठी वाटप होईल. यात्रेत गॅस वापरास बंदी करण्यात आली आहे. आपले रहिवाशी प्रमाणपत्राची /आधारकार्डची सत्यप्रत द्यावी लागेल.
२) श्री. खंडेश्वरी देवी संस्थान विश्वस्त मंडळाचा ठराव ०१ प्रमाणे आकाशवाणी टी पॉईंटपासून रोडची दोन्ही बाजू व श्री. खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात छायाचित्रांकित डिजीटल बोर्ड जाहिरात लावण्यास मनाई केली असून जो या निर्णयाचे उल्लंघन करील अशा व्यक्तीविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
३) तसेच ज्या भाविक भक्तांना नवरात्र महोत्सवात देवीची महाआरती रात्री ०८:३० वा करावयाची असेल त्यांनी अगावू सुचना ०४ दिवस अगोदर मंदिराच्या कार्यालयात नोंद करावी किंवा श्री. खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्टचे कोषाध्यक्ष श्री. राजेंद्रजी बन्सोडे यांच्याशी संपर्क करावा.

**(संपर्क क्रं. ९४२२२४०१५५)**

**स्वाक्षरित** **स्वाक्षरित**
**अध्यक्ष** **सचिव**
**श्री. खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्ट, बीड**




## लक्ष्मण हाके यांनी आपल्या कुटुंबातील मुलगी माझ्या कुटुंबातील मुलांना द्यावी : ॲड. गणेश मोरे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सामाजिक कार्यकर्ते समाजसेवक ॲड. गणेश मोरे यांनी लक्ष्मण हाके यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल



थेट लक्ष्मण हाके यांनाच आवाहन केले आहे. लक्ष्मण हाके यांनी आपल्या कुटुंबातील मुलगी आमच्या कुटुंबातील मुलांना द्यावी. माझ्या कुटुंबातील माझा भाऊ माझे पुतणे तसेच माझे नातेवाईक हे उच्चशिक्षित असून आम्ही सक्षम आहोत. वडिलोपार्जित शेकडो एकर जमीन सुद्धा आम्हाला आहे. माझा भाऊ तसेच माझा पुतण्या नोकरदार असून तो सुद्धा

▶▶ उर्वरित पान २ वर

# हवामान बदलावर मात करण्यासाठी दीर्घकालीन शाश्वत उपायांची नितांत गरज!

## ग्लोबल विकास ट्रस्टकडून परिस्थितीचे वस्तुनिष्ठ चिंतन

मराठवाड्यातील यंदाचा पाऊस मृत्यू आणि विध्वंस घेऊन आला. केवळ दोन महिन्यांच्या कालावधीत तब्बल ५२ शेतकऱ्यांचे जीव पावसामुळे गेले, १,०६७ जनावरे दगावली, ३,००० हून अधिक घरे कोसळली आणि तब्बल १२ लक्ष ८६ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. या आपत्तीमुळे १६ लाख १५ हजार ४६६ शेतकरी थेट संकटात सापडले आहेत. आकडे पाहता ही परिस्थिती केवळ आकस्मिक नाही, तर वाढत्या हवामान बदलाचे स्पष्ट संकेत आहेत. मराठवाडा विभागात समावेश असलेल्या बहुतांश जिल्ह्यात यंदा पावसाने सरासरी ओलांडली आहे. नांदेड जिल्ह्यात तर अक्षरशः कहर केला असून, नद्या – नाले तर एक झालेच, मात्र सर्वदूर पाणीच पाणी झाल्याने शेतीचे अन् मातीचे प्रचंड नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीला कोणी रोखू शकत नाही, मात्र शाश्वत उपायांनी त्यापासून होणारे नुकसान काही अंशी नक्कीच टाळता येऊ शकते. वाहत्या पाण्यामुळे होणारी मातीची धूप आणि वायुप्रदूषण रोखण्यासाठी जलनायक मयंक गांधी यांनी संस्थापित केलेल्या ग्लोबल विकास ट्रस्टकडून परिस्थितीचे वस्तुनिष्ठ चिंतन केले जात आहे. जास्तीत जास्त फळझाडांची लागवड करावी, जेणेकरून त्यापासून या दोन्हीही गोष्टी थांबतील व दुसरी अत्यंत महत्वाची गोष्ट अशी की त्यातून शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नही मिळेल.

गेल्या दशकात दरवर्षी अतिवृष्टीमुळे २५ ते ३० शेतकऱ्यांचे मृत्यू सरासरीने होत असताना यंदा मृतांचा आकडा दुप्पट झाला. एकीकडे अल्पावधीत मुसळधार पाऊस व पूर, तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर अवर्षनामुळे दुष्काळी अंतर, ही दोन्ही टोकाची चित्रे एकाच हंगामात दिसू लागली आहेत. हा विरोधाभास निसर्गाच्या लहरीपणाचा नाही, तर पृथ्वीचे वाढते तापमान आणि हवामान बदलाचे थेट परिणाम आहेत. वाढते उद्योग, वाहनांची वाढती संख्या आणि त्यातून होणारे वायू प्रदूषण हे तर होते आहेच. परंतु त्याच्या बरोबरीनेच जलप्रदूषण, मातीप्रदूषण असेल अशा अनेक गोष्टींचे प्रदूषण नक्कीच वाढले आहे. हे चित्र कुठेतरी थांबावे यासाठी आणि प्रदूषण घडवून आणणाऱ्या घटकांनी जबाबदारी घेऊन पर्यावरण संवर्धनासाठी पुढे यायला हवे.



मराठवाड्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाची भूमिका येथे निर्णायक ठरते. आपत्ती घडली की आर्थिक मदत, कर्जमाफी किंवा पिकविमा हे उपाय आवश्यकच आहेत. पण ही तात्कालिक उपाययोजना असून दीर्घकालीन दृष्टीकोनाशिवाय समस्या पुन्हा पुन्हा डोके वर काढणार हे निश्चित आहे.

शासनाने आता खालील तीन पातळ्यांवर ठाम भूमिका घेणे अपरिहार्य आहे:

१. तातडीची मदत: नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत व विमा दावे पारदर्शकपणे देणे.

२. शाश्वत शेती उपाय: जलसंधारण, सिंचन व्यवस्थेचे आधुनिकीकरण, पाण्याचे नियोजन आणि हवामानाशी सुसंगत पीकपद्धती राबवणे.

३. हवामान बदलाचा प्रतिकार: भविष्यात अशा आपत्ती कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड मोहिमा राबवणे, पर्यावरणाचे संतुलन पुनर्स्थापित करणे.

हवामान बदल ही आता दूरची संकल्पना नाही, तर आपल्या शेतकऱ्यांच्या अंगावर कोसळणारी कठोर वस्तुस्थिती आहे. म्हणूनच वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास ही त्रयसूत्री तातडीची शेतकऱ्यांच्या घामाला न्याय देणे म्हणजे त्यांच्या भवितव्याला सुरक्षित करणे आणि त्यासाठी शासनाने आणि त्यासोबतच इतर सर्व घटकांनी पुढाकार घेतला तरच शेतकऱ्यांचा आवाज खऱ्या अर्थाने उमटेल.

भविष्यकाळाचा विचार

हवामान बदलांचा सामना करण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड आणि पर्यावरण संवर्धन. वृक्ष म्हणजे केवळ सावली नाही तर हवामान संतुलनाचा पाया आहेत. जर शासनाने याकडे दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून पाहिले तर भविष्यातील पिढ्यांना या टोकाच्या आपत्तीपासून दिलासा मिळू शकतो.

कोट्यवधी वृक्षांची लागवड : दीर्घकालीन उपाय

दुष्काळ असो वा अतिवृष्टी, ही समस्या केवळ मराठवाड्यापुरती मर्यादित राहिलेली नाही ; ती संपूर्ण महाराष्ट्र, अगदी देशभर पसरलेली लहरी हवामान बदलाची परिणती आहे. नुकत्याच झालेल्या पावसाने पंजाब आणि हरियानाचे झालेले हाल आपण पाहत आहोत. यामागील मूळ कारण म्हणजे पृथ्वीचे वाढते तापमान आणि जागतिक पातळीवर निर्माण झालेली ग्लोबल वॉर्मिंगची भीषण परिस्थिती. त्यामुळे केवळ तात्कालिक उपायांनी हा प्रश्न सुटणार नाही ; दीर्घकालीन शाश्वत धोरणांची गरज आहे. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी कोट्यवधी वृक्षांची लागवड, त्यांचे संवर्धन आणि हरित क्षेत्र वाढवणे हा हवामान बदलावर मात करण्याचा मूलभूत व प्रभावी मार्ग ठरू शकतो.

ग्लोबलची वैश्विक भूमिका

जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेल्या ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून मागील काही वर्षांत तब्बल ६.५ कोटीपेक्षा जास्त फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. ज्यामधून अनेक गोष्टी एकच वेळी सध्या झाल्या आहेत. एकतर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात फळबागेमुळे कैक पटीने वाढ झाली, दुसरी गोष्ट फळझाडांच्या लागवडीमुळे हरीतक्षेत्रात वाढ होऊन पर्यावरणाचे संवर्धन झाले आहे. विशेष म्हणजे यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात वाढ झाल्याने त्यांचा शेतीविषयक आत्मविश्वास अधिकच द्विगुणित होऊ शकला. ज्यामुळे शेतकरी आत्महत्येसारख्या जटिल गंभीर समषया वर कायमस्वरूपी मार्ग निघू शकतो. म्हणून ग्लोबल विकास ट्रस्टने जो वैश्विक विचार दिल आहे त्याचे सर्वत्र अनुपालन केले पाहिजे. ही संस्था इच्छुक शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण तर देतेच परंतु शाश्वत शेतीसाठी आवश्यक सर्व बाबी उपलब्ध करून दिल्या जातात. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी संस्थेशी जोडले जाऊन ती भूमिका आत्मसात केली पाहिजे.

**– दत्तात्रय काळे**

# निराधार महिलांसाठी 'शक्ती सदन'चा आधार

महाराष्ट्र कल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जाते. महिला सक्षमीकरण, सबलीकरणात आपले राज्य देशात अव्वल आहे. महिलांना शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्रात शासनाने नेहमीच पुढाकार घेतला आहे. विकासाच्या मुख्य प्रवाहात महिला नेतृत्वक्षम व्हाव्यात यासाठी देखील विविध उपाययोजना राबविल्या जात आहे. या योजनांच्या माध्यमातून आपल्या राज्यातील महिलांचे शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे. महिला सक्षमीकरणाचा समृद्ध वारसा आपल्या राज्याला आहे. हा वारसा राज्य शासन पुढे नेत असून महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबवित आहे, त्यापैकी एक म्हणजे 'शक्ती सदन योजना' आहे. या योजनेमुळे निराधार महिलांना राज्यशासनाने 'शक्ती सदन'चा आधार दिला असल्याची भावना महिलांमध्ये आहे. या योजनेमुळे निराधार महिलांचे जीवन सुसह्य होण्यास मदत होत असून शासनाची ही योजना निराधारांचे जीवनमान उंचावत आहे.



शक्ती सदन योजना

राज्यातील निराधार, निराश्रित, नैसर्गिक आपत्तीत, कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय मदत, कायदेविषयक समुपदेशन हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन, समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी 'शक्ती सदन योजना' राबविण्यात येते. २८ जिल्ह्यातील ४३ संस्थामध्ये ६३०० महिलांची काळजी व संरक्षण शक्ती सदनमार्फत करण्यात येत आहे. तसेच लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या, अनैतिक व्यापारात अडकलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण देऊन पुनर्वसन महिला व बालविकास विभागामार्फत राज्यात केंद्र पुरस्कृत शक्ती सदन या योजनेच्या माध्यमातून करण्यात येते. शिवणकाम, ड्रेस डिझायनींग, टायपींग,एम एच सीआयटी कोर्स, नर्सींग असे विविध व्यावसायिक शिक्षण दिले जाते तसेच उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन व मदत केली जाते. शक्ती सदनची मदत घेण्यासाठी वैयक्तिक महिला अथवा सामाजिक संस्थांना जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागात मार्गदर्शन करण्यात येते.

महिलांची सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी केंद्र शासनाकडून मिशन शक्ती हा एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत संबल व सामर्थ्य या दोन उप योजना राबविण्यात येतात. यापैकी सामर्थ्य उपयोजनेंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येत असून या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

विधवा महिला, कुटुंबाने दुर्लक्षित केलेल्या सामाजिक व आर्थिक पाठबळाशिवाय राहणाऱ्या महिला, नैसर्गिक आपत्तीमध्ये बेघर झालेल्या महिला, कुटुंबाने आधार काढून घेतलेल्या निराधार, कौटुंबिक हिंसाचारात बळी पडलेल्या, अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या महिला व मुली, लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिला व मुली, तसेच १२ वर्षापर्यंतच्या मुलींना 'शक्ती सदन' येथे राहण्याची जास्तीत जास्त तीन वर्षासाठी राहण्याची परवानगी असते. त्यापुढे त्यांच्या परिस्थितीनुसार निर्णय घेण्यात येतो. ५५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या महिलांना पाच वर्षापर्यंत राहण्याची सोय असते त्यानंतर त्यांना वृद्धाश्रमात स्थलांतरीत केले जाते. स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने महिलांचे सहाय्य व पुनर्वसन शक्ती सदनच्या माध्यमातून करण्यात येते. राज्यात चंद्रपूर, बीड, अहिल्यानगर, धाराशिव, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, पालघर, लातूर, गडचिरोली, भंडारा, धाराशिव, नागपूर, मुंबई उपनगर (२), पुणे, अकोला, लातुर, सांगली, भंडारा, वाशिम तसेच अकोला या जिल्ह्यात २१ ठिकाणी 'शक्ती सदन' कार्यरत आहे. २२ राज्य महिला गृहे कार्यरत आहेत.

या योजनेअंतर्गत अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच, पिडीत महिलेला कायदेशीर सहाय्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत दिले जाते. आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपचारांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. 'वन स्टॉप सेंटर' या योजनेअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या समुपदेशकांमार्फत सदनातील महिला व मुलींना मनो-सामाजिक समुपदेशन व सेतू सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. ई-लर्निंग व खुल्या शाळा प्रणालीसाठी आवश्यक साहित्य पुरविण्यात येतात. कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या अंतर्गत रोजगार आणि प्रशिक्षण महासंचालनालय किंवा राष्ट्रीय कौशल्य विकास प्रशिक्षण परिषद यांचेकडे नोंदणीकृत संस्थामार्फत शक्ती सदनातील महिलांना व्यावसायिक तथा कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, शक्ती सदनातील महिलांच्या नावे बँक खाते सुरू करून ५०० रूपये एवढी रक्कम जमा करण्यात येते. सदनामधून बाहेर पडताना संबंधित महिलेस व्याजासह संपूर्ण रक्कम देण्यात येते.



मानवी तस्करी व देह विक्री व्यवसायास बळी पडलेल्या पिडितांच्या पुन:एकात्मिकरण व प्रत्यापर्णासाठी मानवी तस्करी विरोधी युनिट्सना शक्ती सदनामार्फत हाफ – वे होम अंतर्गत पिडीत महिलेला नोकरी करण्याची संधी देण्यात येते. जेणेकरून पिडितांना सदनातील जीवनापासून ते समाजातील स्वतंत्र जीवनामध्ये सहजपणे संक्रमण करता येईल. याचबरोबर पिडीत महिलेला मायदेशी पाठविण्यासाठी संपूर्ण जबाबदारी घेतली जाते. प्रत्येक शक्ती सदनात महिलांची कमाल क्षमता ही ५० इतकी आहे.

सक्षम पोर्टल – 'सक्षम पोर्टल' ही एक वेब बेस यंत्रणा आहे, या माध्यमातून राज्यातील महिला संरक्षणगृह, शक्तीसदन गृह यामध्ये दाखल होणाऱ्या पिडीत गरजू महिलांची बायोमेट्रिक नोंद घेण्यात येते. यामध्ये दाखल होणाऱ्या महिलांच्या बोटाचे ठसे तसेच फोटो घेतला जातो, महिलेची प्राथमिक माहिती, कौटुंबिक माहिती घेतली जाते. पिडीत महिला संरक्षणगृहातून बाहेर पडल्यावर सुद्धा नोंद घेण्यात येते. सर्व संरक्षणगृह एकमेकांना जोडली गेलेली असल्यामुळे सदर महिला इतर कोणत्याही गृहामध्ये पुन:प्रवेशित झाल्यास तिची माहिती ऑनलाईन दिसणार आहे.

ही योजना ७ डिसेंबर २०२३ पासून सुरु करण्यात आली असून, सध्या ६३०० महिलांची माहिती सक्षम पोर्टलवर नोंदविली गेलेली आहे. सुरवातीला ५-७ शासकीय महिला राज्यगृहांमध्ये ही योजना राबविण्यात आली नंतर टप्प्याटप्प्याने उर्वरित शासकीय महिला राज्यगृहांमध्ये राबविण्यात आली. एप्रिल २०२५ मध्ये केंद्र पुरस्कृत शक्तीसदन योजनेच्या संस्थांचा सुद्धा यात समावेश करण्यात आला. २८ जिल्ह्यातील ४३ संस्था सक्षम पोर्टलवर जोडल्या गेलेल्या आहेत, यामध्ये २१ शांती सदन, २२ महिला राज्यगृहांचा समावेश आहे. तसेच, १०० पेक्षा जास्त वापरकर्ते आहेत.

**– श्रद्धा मेश्राम, विभागीय संपर्क अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

◆ पान ९ वरून पुढे...

## मराठा आरक्षणाबाबत....

आहे. पण मराठ्यांना ओबीसीत घुसवण्याची घीसडघाई कायद्याच्या कचाट्यात अडकणार हे स्पष्ट आहे. त्यातच यापूर्वी सरकारने मराठ्यांसाठी आरक्षणाचा एक खुशकीचा मार्ग काढला होता. मराठा एसईबीसी आरक्षणाची (चरीरींहर डएइउ ठशीर्शींरींळेप) आता न्यायालयीन लढाईत कसोटी लागत आहे. सरकारसमोर हे आरक्षण टिकवण्याचे मोठं आव्हान तर आहेच. पण ही लढाई हातची गेली तर सरकार शब्दाला पक्के नाही असा मॅसेज जायलाही वेळ लागणार नाही. त्यामुळे मराठा एसईबीसीच्या कायदेशीर लढाईत सरकारला जपून पाऊल टाकावं लागणार आहे. सामाजिक वीण सैल न होता ओबीसी आणि मराठ्यांची एकसांगड घालणं गरजेचे आहे. आज हायकोर्टातील सुनावणीच्या निमित्ताने सरकारसमोर काही आव्हानात्मक मुद्दे समोर येत आहेत. कोणते आहेत हे मुद्दे? आज मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकांवर पूर्णपीठासमोर एकत्रित सुनावणी झाली. त्यावेळी मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांचे वकील प्रदीप संचेती यांनी अनेक मराठा श्रीमंत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत.मराठा समाज मागास नाही असा युक्तीवाद केला. मराठा समाज मागास नाही हे पटवून देण्यासाठी त्यांनी वेगवेगळे दाखले दिले. तर राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी राज्यात २८ टक्के मराठा आहेत त्यातले २५ टक्के गरीब आहेत, अशी बाजू मांडली. युक्तीवाद पाहता आता मराठा समाज हा मागास आहे. मुख्य प्रवाहात नाहीये. हे डएइउ आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान राज्य सरकारला सिध्द करावे

◆ पान ९ वरून पुढे...

लागणार आहे. मराठ्यांचं मागासलेपण कशात?- तीन श्रेणीत मराठा समाज मागास आहे हे सिध्द करावं लागणार आहे. त्यामध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकरित्या समाज मागास आहे हे कोर्टासमोर मंडावे लागणार आहे. आज फक्त शैक्षणिकदृष्ट्या मराठा समाज मागास आहे की नाही यावर युक्तिवाद झालेला आहे. पुढच्या सुनावणीवेळी आर्थिक आणि सामाजिक प्रवर्गात मराठा समाज मागास आहे का यावर वेगवेगळे दाखले देत युक्तिवाद होणार आहे. प्रदीप संचेती यांनी SEBC आरक्षणाला विरोध करणारा युक्तीवाद केला तर महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी राज्यसरकारतर्फे कोर्टात बाजू मांडली पुढील सुनावणी ४ ऑक्टोबर रोजी होईल.

## आधी लाठ्या...

नागनाथ नन्नवरे या तरूणास दहा ते बारा लोकांच्या टोळयाने मारहाण करत फरफटत नेत अपहरण केल्याचा व्हिडिओ आज सकाळी सोशल मिडीयावर व्हायरल झाला अन् पुन्हा एकदा बीड जिल्ह्यात खळबळ उडाली. सदरची घटना घडल्यानंतर नन्नवरे यांच्या पत्नी दिया नन्नवरे यांनी तात्काळ बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तीन व्यक्ती सह अन्य अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस प्रशासनाने तातडीने तपास सुरू केला असून आरोपींचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू असतांना हे आरोपी भूम तालु३यात असल्याचे पोलिसांना समजल्यानंतर अंबी पोलीस ठाणे हद्दीत आज पहाटे दहा जणांना बीड पोलिसांनी ताब्यात घेतले. यामध्ये एक महिलेचा समावेश आहे. प्राथमिक चौकशीत दिलेल्या माहितीनुसार, या

◆ पान ९ वरून पुढे...

हल्ल्यामागे दिया नन्नवरे यांच्या पहिल्या पतीचा हात असल्याचा संशय व्ये केला जात आहे. मात्र, अद्याप हल्ल्याची नेमकी कारणे स्पष्ट झालेली नाहीत. गोरे वस्ती परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिक या घटनेमुळे घाबरले आहेत.

## हृदयद्रावक... सरकार...

शैक्षणिक नुकसानीबाबत शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. मागील दोन वर्षापासून या भागांमध्ये सातत्याने मल्हार कोळी आणि महादेव कोळी समाजाने उर्वरित महाराष्ट्र राज्य लागू असेलेले निकष आहेत तेच निकष लावून आम्हाला जात प्रमाणपत्र देण्यात यावेत. व्हॅलिडीटी सोपी आणि सहज करावी यासाठी आंदोलन उभं केलं होतं. १७ तारखेला मराठवाडा भर आंदोलनाची हाक देण्यात आली होती. या सर्व पार्श्वभूमीवर ही आत्महत्या आंदोलनाला आणखीन तीव्र करेल अशी चिन्हे आहेत.

## गेवराई पोलिस...

नागरिकांचा विश्वास संपादन करणे व न्याय देणे हेच त्यांचे ब्रीद राहिले आहे. गेवराईत अलीकडील काळात राजकीय-सामाजिक तणाव तसेच आरक्षणाच्या मुद्यांवर घडलेल्या घटनांचा विचार करता, नव्या उपअधिक्षकांकडून नागरिकांना न्याय मिळवून देणे व कायदा सुव्यवस्थेचा धागा घट्ट ठेवणे या बाबतीत विशेष प्रयत्न होतील, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. नागरिकांच्या सुरक्षेसह कायद्याचा धाक प्रस्थापित करणे आणि अवैध वाळू वाहतुकीस आळा घालणे

◆ पान ९ वरून पुढे...

ही त्यांच्यासमोरची प्राथमिक आव्हाने आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे गेवराईत गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणले जाईल

## लक्ष्मण हाके...

अविवाहित असून त्याला लक्ष्मण हाके यांनी त्यांची मुलगी अथवा बहीण द्यावी. आता लक्ष्मण हाके त्यांना गणेश मोरे यांनी आवाहन करत सोयरीकीची मागणी केली आहे. आता आम्ही तर ओबीसी मध्ये गेलो आहोत. मग तुमची मुलगी आमच्या कुटुंबात द्या, तुमची मुलगी आम्ही करण्यास तयार आहोत. आमच्या कुटुंबामध्ये नातेवाईकांमध्ये सर्व अकरा मुले अविवाहित असून सर्वच उच्चशिक्षित आहेत आणि शेकडो एकर जमीन ही वडीलोपार्जित आहे. त्यासाठी लक्ष्मण हाके यांनी आपल्या कुटुंबातील मुलगी आम्हाला द्यावी. हिंदू धर्मामध्ये आंतरजातीय विवाह परंपरा पहिल्यापासूनच महाराष्ट्रात चालू आहे. परंतु आता आपण तर ओबीसी झालो आहोत. त्यासाठी आता नातेसंबंध करा, राजकारातील स्व. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांना आदर्श आणि दैवत मानतो. राजकारण आणि सामाजिक चळवळीतील माझे आदर्श लोकनेते विनायकराव मेटे साहेब आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब हे माझे कायम आदर्श आणि दैवत मानत आहे. म्हणून येणाऱ्या काळामध्ये रोटी – बेटी व्यवहाराचा विषय येत असेल तर आपण दिलेल्या आवाहन प्रमाणे आपल्या कुटुंबातील मुलगी ही माझ्या कुटुंबात सुन म्हणुन स्वीकार करतो. पुढील काळामध्ये आमच्या कुटुंबात तुमच्या मुलीला आम्ही मुली प्रमाणे सांभाळू असे आवाहन ॲड. गणेश मोरे यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कलाकार-रसिकांची 'रेंज' जुळली; अनिलदादांनी बीड रंगभूमीवर उभारला ऐतिहासिक नाट्य सोहळा !

## रेंज पाहिजे नाट्य प्रयोगासाठी बीडकरांची तौबा गर्दी ; रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यात तरवळले आनंदाश्रू!





**बीड । प्रतिनिधी**

अनिल दादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना प्रस्तुत 'रेंज पाहिजे' या नाटकाच्या माध्यमातून अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीड रंगभूमीवर नाट्यदिप प्रज्वलीत झाला असून कलाकार आणि रसिक प्रेक्षकांमध्ये नवचैतन्य संचारले. काल रोजी बीडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भरगच्च रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत शहरातील सत्तर कलाकारांचा सहभाग असलेले सोनल नहार लिखित आणि लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत रेंज पाहिजे या नाटकाचा पाहिला प्रयोग सादर झाला. बीड हा कलाकारांचाच बालेकिल्ला आहे. फक्त कुणीतरी पुढाकार घेण्याची आवश्यकता होती आणि हा पुढाकार चला, बीडच्या नाट्यपरंपरेला सुवर्णयुगाकडे नेऊ या म्हणत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी घेतल्याने बीडमध्ये खंडित पडलेल्या नाट्य परंपरेला पुन्हा नव्याने जोरदार प्रारंभ झाला असून संपूर्ण शहराच्या सांस्कृतिक चेतनेला नवजीवन लाभले आहे. सोनल नहार यांच्या समर्थ लेखणीतील संवाद, लक्ष्मीकांत दोडके यांच्या दिग्दर्शनातील ठाशीव छाप आणि तब्बल सत्तर कलाकारांचा एकत्रित सहभाग या त्रिवेणीने बीडच्या रंगभूमीवर एक अद्भुत असा सोहळा घडवून आणला. दोन महिन्यांच्या कष्टसाध्य तालमीमधून घडवलेली ही कलाकृती प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेली. नाटकातील प्रत्येक पात्राने स्वतःची छाप सोडली. काहींनी हसवले, काहींनी रडवले, काहींनी विचार करायला लावले पण अखेरीस सर्वांनी अंतर्मनाला भिडणारा ठसा उमटविला. रसिकांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या नाटकाचे खरे यश ठरले. नाटकाचे सहाय्यक दिग्दर्शक रोहित पुराणिक आणि निर्मिती सूत्रधार प्रतीक कांबळे यांनी या कलाकृतीला भक्कम पाया दिला. संगीत, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रामाणिक मेहनतीमुळे हे नाटक केवळ प्रयोग न राहता रसिकांच्या मनाचा सोहळा ठरले. एकंदरित रेंज पाहिजे हे नाटक बीडच्या रंगभूमीच्या नव्या पर्वाची जोरदार सुरूवात ठरले आहे. रेंज पाहिजे या नाट्यप्रयोगाचे उदघाटन जेष्ठ कलावंत भरत अण्णा लोळगे, दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमतभाऊ भंडारी, दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोषजी मानूरकर, जेष्ठ रंगकर्मी डॉ उज्वला वनवे, शिक्षक प्रेरक वैद्य सर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक आणि हेवन व्हेज रेस्टोरंटचे संचालक तनय शेळके यांनी रंगमंचाचे विधिवत पूजन करून केले व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

### कलाकारांची स्वप्ने रंगवण्यासाठी शिवसेना कायम सज्ज– अनिलदादा जगताप



**शिवसेनेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक या स्पर्धेपासून बीडमध्ये खऱ्या अर्थाने कलाकारांना घडण्यासाठी पोषक असे सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले आहे. आज या ठिकाणी मला आत्यानंद होतो आहे की, या चंपावती महोत्सवात तयार झालेले कलाकारच बीडमध्ये खंड पडलेल्या नाट्यपरंपरेला संजीवनी देण्याचे काम करत आहेत अशा परिस्थितीत आमच्या सारख्या बाळासाहेबांच्या शिवसैनिकांनी त्यांच्या पाठीशी उभा राहणे गरजेचे आहे. कलाकारांनी स्वतःचे स्वप्न साकारण्याकरिता मेहनत करावी, पुढे येत राहावे आपल्या बीडचे नाव राज्याच्या आणि देशाच्या रंगभूमीवर गाजवावे, शिवसेना खंबीरपणे कलाकारांच्या पाठीशी सदैव उभी आहे, अशी प्रांजळ भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नाटकाच्या उदघाटना प्रसंगी व्यक्त केली.**

## संभाजीनगर येथे राज्यस्तरीय अधिवेशन

### याच ठिकाणी होणार परिषद पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक– जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. याच ठिकाणी दुपारी तीन वाजता परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरावरील त्रेमासिक बैठक होणार आहे. अधिवेशन आणि या बैठकीला सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले आहे. छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात



दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्धाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे ,कोषाध्यक्ष शेख मन्सूर भाई ,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले आहे.

### नागरिकांनी आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घ्यावा: राज्य आरोग्य हमी सोसायटीचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**


महाराष्ट्रात 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' एकत्रित राबविण्यात येत असून राज्यातील सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. एकत्रित योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांच्या मर्यादेत १३५६ उपचार पद्धतींवर शासकीय तसेच खासगी अंगीकृत रुग्णालयांमध्ये विनामूल्य उपचार मिळणार आहेत. पिवळे, केशरी, अंत्योदय,अन्नपूर्णा योजना किंवा पांढरे रेशनकार्ड धारक कुटुंब तसेच सर्व शासकीय व निमशासकीय अधिकारी–कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय या योजनेत समाविष्ट आहेत. विशेष म्हणजे या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही.

सर्व लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड राज्यातील आशा कर्मचारी, आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचारी तसेच स्वस्त धान्य दुकान चालक यांच्या मार्फत तयार केले जात आहेत. लाभार्थी स्वतःही आयुष्मान ॲप किंवा https://beneficiary.nha.gov.in/ या संकेतस्थळावरील बेनिफिशरी पर्यायाद्वारे आपले कार्ड तयार करू शकतात. कार्ड निर्मितीसाठी अद्ययावत शिधापत्रिका, आधार क्रमांक आणि आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक आवश्यक आहे, असे राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब चव्हाण यांनी कळविले आहे.

## पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या जयंती निमित्त लोकरत्न पुरस्काराचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

देशभक्त, पद्मश्री डॉ. रत्नप्पा कुंभार यांच्या ११६ व्या जयंती महोत्सव निमित्त १५ जणांचा लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ, वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर, अखिल भारतीय प्रजापती महासंघाचे आर.बी.के. प्रजापती, कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतिष दादा दरेकर यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे होणार आहे. या जयंती महोत्सवाला उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा कुंभार समाजाच्या वतीने करण्यात आला आहे.



कार्यक्रमाची माहिती देताना समितीचे अध्यक्ष महेश सायकर म्हणाले की, स्वातंत्र्यसैनिक पद्मश्री डॉ. रत्नप्पा कुंभार यांचा ११६ वा जयंती महोत्सव १५ सप्टेंबर रोजी दादर–माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माटुंगा (पश्चिम) मुंबई येथे समन्वय समितीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. डॉ. रत्नप्पा कुंभार हे स्वातंत्र्यसैनिक, संविधान समितीचे सदस्य आणि पहिले कॅबिनेट मंत्री होते. त्यांना अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रातील १५ यशस्वी सामाजिक कार्यकर्त्यांना 'लोकरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाला आमदार महेश सावंत, आयएएस अधिकारी अजित कुंभार, उपजिल्हाधिकारी, मुंबईच्या मनीषा कुंभार, महापौर, मुंबई च्या किशोरीताई पेडणेकर, दत्ता नरवणकर यांच्यासह आदींची उपस्थिती राहणार आहे. बीड सह राज्यातील कुंभार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिक्षक रामदास कुंभार, चनबस वायकर, अर्जुन दळे, भीमराव देळे, गणेश जाधव, कैलास कुंभार, जालिंदर करडकर, राम पोपळे, विठ्ठल गोरे, दत्ता रामरूले, अंकुश इतापुरे, बळीराम करडकर, महेश इटकर, राहुल कुर्लेकर

## आदिवासींच्या जीवनात येत्या 3 वर्षांत आमुलाग्र परिवर्तन घडेल: मुख्यमंत्री फडणवीस

**यवतमाळ । प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने महत्वाच्या योजना हाती घेतल्या असून, त्यासाठी देशात १ लक्ष कोटी रू. निधी उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातही आदिवासी समाजासाठी घरे, रस्ते, वीज, पाणी, वसतिगृह व रोजगार अशा सुविधांसाठी योजना–उपक्रम राबविण्यात येत असून, पुढील ३ वर्षांत आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे एकूण ३३५ कोटी रु.च्या विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन तसेच विविध उपक्रमांचा शुभारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. मृद व जलसंधारण मंत्री तथा




जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार संजय देशमुख, आमदार राजू तोडसाम, आमदार किसनराव वानखेडे, सईताई डहाके, संजय डेरकर, श्याम कोडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी विकास मीना आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आदिवासी समाजासाठी ५४ हजार कुटुंबांना घरे, नळांद्वारे पाणी, उपचारासाठी दवाखाने, वसतिगृह अशा अनेक सुविधा वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासी विकासासाठी ज्या योजना व उपक्रम आणले, तशी भरीव कामगिरी त्यापूर्वी झालेली नाही. आदी कर्मयोगी योजनेतून जिल्ह्यातील ३६६ गावांची निवड झाली आहे. योजनेतून राज्यातील ३० लाख युवकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. त्यातून स्थानिक नेतृत्वाचा विकास होणार आहे. शासनाने अनुकंपा तत्वावरील सेवाप्रवेशाचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला. त्यात पंधरा हजार युवकांना अनुकंपातून नियुक्ती देण्यात येणार आहे. सुमारे ३५ मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शेतीला १२ तास दिवसा वीज मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा दहा तास मोफत वीज देण्याचेही नियोजन आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांसाठी आवश्यक सुविधांच्या अनुषंगाने निधीची कमतरता पडू देणार नाही. पावसाने जिल्ह्यात शेती, घरे, पशुधन यांचे नुकसान झाले. त्याची भरपाईही लवकरात लवकर अदा केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## ७.९६ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ ची परतफेड

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ७.९६ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ अदत्त शिल्लक रकमेची दि. १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल,असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे. परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुट्टी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. १४ ऑक्टोबर, २०२५ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप–विनियम २४(२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप–कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ७.९६ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली, असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत. भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केले जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे.

रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोक ऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणाऱ्या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील,असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्रात नमूद केले आहे.

## आमदार सुरेश धस ॲक्शन मोडमध्ये : कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला गती देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी भाग कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या कृष्णा मराठवाडा प्रकल्प – उपसा सिंचन योजना क्र. ३ (खुंटेफळ साठवण तलाव) या महत्त्वाकांक्षी योजनेच्या भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियेस गती देण्यासाठी आज जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत आमदार सुरेश



धस यांनी थेट आघाडी घेत क्शन मोडमध्ये काम करताना संबंधित विभागांना ठोस निर्देश दिले. त्यांनी खुंटेफळ, कुंभेफळ आणि सोलापुरवाडी या बुडीत क्षेत्रांचे भूसंपादन तातडीने पूर्ण करणे, गावठाण मोजणी व बाधित घरांचे मूल्यांकन करून पुनर्वसनाची प्रक्रिया गतीमान करणे, कृषी व स्थापत्य घटकांची संयुक्त मोजणी करून कलम १९ ची कार्यवाही पूर्ण करणे तसेच सोनाळवाडी व बर्गेवाडी येथील बुस्टर पंपगृहांसाठी भूसंपादनाचे काम प्राधान्याने करणे या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडली.

आमदार धस म्हणाले, सन २००९ मध्ये माझ्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या योजनेला मान्यता मिळाली. उजनी जलाशय–शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलाव थेट पाईपलाईनचे काम सुरू असून, या प्रकल्पामुळे अंदाजे १० हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे मतदारसंघ कायमस्वरूपी दुष्काळमुक्त होईल. अधिसूचना जानेवारी २०२६ पर्यंत वाढवली असली तरी कामे प्रलंबित राहू नयेत. संबंधित विभागांनी भूसंपादन व पुनर्वसनाची सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत.

तसेच या बैठकीत सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढवणे, सिंदफणा व्हॅलीतील प्रलंबित साठवण तलावांची कामे, नगरपंचायत व वन विभागातील जमीन हस्तांतरण, नायगाव राष्ट्रीय मयूर अभयारण्यात वृक्षतोड व पर्यटन सुविधा, पैठण–पंढरपूर महामार्गावरील मावेजा, मच्छिंद्रनाथ गड विकास आराखडा, अहिल्यानगर–बीड–परळी रेल्वे मार्गावरील अडचणी, शिरूर तालुक्यातील अतिवृष्टीबाबत विमा तक्रारी, सौर व पवन ऊर्जा प्रकल्पांमुळे निर्माण झालेले प्रश्न, शहीद जवानांच्या कुटुंबीयांना शेतीयोग्य जमीन वाटप तसेच ७/१२ दस्त नोंदीची प्रलंबित कामे अशा विविध मुद्द्यांवरही जिल्हाधिकाऱ्यांबरोबर सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीस लाभक्षेत्र अधीक्षक अभियंता सिंगाडे, कार्यकारी अभियंता घुगे, उपविभागीय अधिकारी श्रीमती शेख, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) धुमाळ, निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी, नगररचनाकार जाधव, उपअधीक्षक भूमि अभिलेख विभाग आष्टी तसेच महसूल, सिंचन व भूसंपादन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समितीस १४ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ: सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी पाटणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीच्या कालावधीस १४ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली. मंत्री शिरसाट म्हणाले, या समितीचा कालावधी १४ सप्टेंबर २०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने, या समितीस प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी १४ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १३/०९/२०२५
**टी.सी. हरवला आहे.**
अभिषेक संजय उबाळे या नावाचा
इयत्ता १२ वि पासचा टी. सी.
बीड ते चराटा बस प्रवास करताना हरवला आहे. कोणास
सापडल्यास संपर्क पत्ता : चराटा ता. जि. बीड.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. १४ सप्टेंबर २०२५ ● पान ४

# आष्टी मतदार संघातील विविध विकास प्रकल्पांबाबत आढावा बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्पांसाठी भूसंपादन, जलसिंचन प्रकल्प, रस्ते, वनीकरण आणि इतर महत्त्वाचे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले. येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास विषयांच्या आढावा बैठकीत आष्टी विधानसभा मतदार संघाचे आमदार सुरेश धस, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रभोदय मुळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, अधिक्षक अभियंता श्री. शिंगाडे, कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी, बीड कविता जाधव, उपविभागीय अधिकारी, पाटोदा वशिमा शेख, वनपरिक्षेत्र अधिकारी, अमोल गरकल तसेच सर्व संबंधित विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.





यावेळी बैठकीत आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्प प्रशासनाच्या दृष्टीने हे सर्व प्रकल्प स्थानिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून सर्व संबंधीत विभागांनी आपले प्रस्ताव तात्काळ सादर करुन त्यास मंजूरी करुन कामे पूर्ण करण्यात यावे. तसेच संबधीत विभागाने यासाठी त्वरित बैठकीचे आयोजन केले आहे आणि तक्रारींचे निराकरण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी दिल्या.

आमदार सुरेश धस आष्टी, पाटोदा, शिरूर (का) मतदार संघात जी विविध विकास कामे सुरु आहेत त्या कामास संबंधीत विभागांनी तात्काळ निर्णय घेवून कामे सुरु करावीत. तसेच ज्या कामात काही अडचण असल्यास जिल्हाधिकारी यांच्या म ार्गदर्शनानुसार ती सोडवून तात्काळ मार्गी लावावीत. मतदार संघातील विविध प्रकल्पांमुळे परिसरातील पाणी व्यवस्थापनात सुधारणा होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सिंचन सुविधाही उपलब्ध होणार आहे. याकरीता आष्टी मतदार संघातील विविध अपूर्ण भूसंपादन प्रकियेसाठी प्रशासनाने तातडीने मार्गी लावाव्यात. प्रशासनाने यासंबंधी योग्य नियोजन करून या विकास प्रकल्पास गती द्यावी. या विकासकामामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणार असल्याचे ते म्हणाले. आष्टी मतदार संघातील कृष्णा मराठवाडा प्रकल्प उपसा सिंचन योजना क्रं. ०३ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलावासाठी भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे. तसेच सिंदफणा मध्यम प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी अतिरिक्त भूसंपादन. सिंदफणा व्हयाली अंतर्गत मदमापुरी, उखळवाड आणि पांगरी साठवण तलावांच्या प्रलंबित भूसंपादन प्रक्रियेला गती देणे. तसेच आष्टी, पाटोदा आणि शिरुर कासार या क्षेत्रांतील महसूल विभाग, जिल्हा परिषद आणि वन विभागाच्या ताब्यातील जमिनी नगरपंचायतींना हस्तांतरणांची प्रक्रिया. नायगाव मयूर अभयारण्य क्षेत्रात गॅरीसिडिया वृक्षांचे समूळ उच्चाटन करून, त्या ठिकाणी परंपरागत देशी औषधी आणि वनवृक्षांची लागवड करणे. पैठण-पंढरपूर रा.मा. २७२ ई प्रकल्पाच्या बंद असलेल्या कामांसाठी शेतकऱ्यांच्या मावेजा वाटप. शिरुर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसानीसाठी विमा कंपन्यांकडून मिळालेल्या विमा रकमांवर तक्रारी.

## थोडक्यात...

### जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक कौशल्य विकास स्पर्धा दर दोन वर्षांनी होते. ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा असून जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलिम्पिक खेळासारखीच आहे. २ वर्षांनी आयोजित केली जाणारी सदर जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई येथे आयोजित होणार आहे. याकरीता जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून याद्वारे गुणवान कौशल्यधारक पात्र स्पर्धक निवडले जाणार आहेत. त्यानुसार सदर जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ मधील जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरीता पात्रता निकष खालीलप्रमाणे आहे. पात्रता निकष : १. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. २. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी ५० क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा तदनंतरचा असणे अनिवार्य आहे. ३. तसेच, Digital Construction, Cloud Computing, Cyber Security, ICT Network Infrastructure, dditive Manufacturing, Industrial Design Technology, Industry 4.0, Mechatronics, Optoelectronic Technology, Robot Systems Integration, Water Technology, Dental Prosthetics, ircraft Maintenance या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००१ किंवा तद्रंतरचा असणे अनिवार्य आहे. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरीता सर्व शासकिय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन महाविद्यालये, एमएसएमई टूल रूम्स, अभियांत्रिकी महाविद्यालये. विद्यापीठे, हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टीट्यूट, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, इतर सर्व प्रशिक्षण संस्था यांना विहीत वयोमर्यादेतील इच्छूक प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन या स्पर्धेसाठी करता येईल. यासाठी सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या लिंकवर भेट देवून दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य रोजगार व उद्योजकता, बीड यांनी केले आहे.

### खत विक्रीसाठी नवीन एल - १ पॉस मशीन कार्यान्वित कराव्यात

**बीड । प्रतिनिधी**

अनुदानीत रासायनिक खताची विक्री खत विक्रेत्यांनी पॉस मशीनच्या माध्यमातून करणे बंधनकारक आहे. अनुदानीत खताची विक्री करणे सुलभ व्हावे यासाठी खत उत्पादक कंपन्याच्या सम न्वयाने शासना मार्फत जिल्हयामध्ये १३४१ खत विक्रेत्यांना नवीन डख पॉस मशीनचे वाटप करण्यात आलेले आहे. याशिवाय जसजशी आयुक्तालय स्तरावरून खत विक्रेत्यांची नावे व पॉस मशीन उपलब्ध होतील त्यानुसार कंपनी प्रतिनिधीच्या समन्वयाने नवीन मशीन वाटप करणे सुरू आहे. २ सप्टेंबर २०२५ पासून जुन्या वाटप केलेल्या डज पॉस मशीन बंद झाल्याने त्याच्या माध्यमातून अनुदानीत खताच्या खरेदी विक्रीचा व्यवहार करता येत नाही. त्यामुळे डख पॉस मशीन तात्काळ कार्यान्वीत करून खत विक्रेत्यांनी खताचा व्यवहार करावा. तसेच ज्या किरकोळ खत विक्रेत्यांनी IFMS आयडी काढले आहेत, परंतु त्यांना खत विक्रीसाठी नवीन पॉस मशीन आवश्यक असल्यास त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कृषी अधिकारी (गुनि) यांच्यामार्फत प्रस्ताव कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांचेकडे एका आठवडयात सादर करावेत. असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे

### हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र.नं १३१/२०२५ कलम १३७ (२) बी.एन.एस. अन्वये दिनाक २५/०५/२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास अनैतिक मानवी वाहतुक कक्ष बीड यांच्या कडे वर्ग करण्यात आला असुन त्यामध्ये पिडीत मुलाचा शोध लागत नसुन मुलगा ओमकार सुधाकर कांबळे वय १८ वर्षे १ महिना रा. जुजगव्हाण ता.जि.बीड हा दिनांक २४/०५/२०२५ रोजी ०६:०० ते ०६:३० वा. चे दरम्यान ढेकणमोह येथे शोध घेतला असता मिळून आला नाही. वगैरे मजकूरा वरून दि. २५/०५/२०२५ रोजी पो. ठाणे पिंपळनेर जि.बीड येथे येवून गुन्हा दाखल आहे तरी सदर मुलाचा आज पावेतो शोध लागला नाही. सदर मुलाचे वर्णन खालील प्रमाणे. नाव- ओमकार सुधाकर कांबळे वय १४ वर्षे १ महिना रु. जुजगव्हाण ता.जि.बीड रंग काळा सावळा, अंगात चौखडा रंगाचे काळे शर्ट व काळी जिन्स पॅन्ट व पायात चप्पल नाही, उंची -१५५ से.मी., शरीर बांधा सडपातळ, भाषा मराठी, हिंदी, पत्ता- रा. जुजगव्हाण, ता.जि.बीड या वर्णनाचा मुलगा आढळून आल्यास प्रभारी अधिकारी, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड दुरध्वनी क्रमांक (०२४४२) २२२३३३ यावर संपर्क साधावा. असे प्रसिध्दीस दिलेल्या वृतात नमूद केले आहे.

### सी.एम.आर.सी.ची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी स्व. विलासरावजी देशमुख सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत अंबाजोगाई लोकसंचलित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी.च्या सचिव रहिमुन्निसा बहादूरखा पठाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमास महिला आर्थिक विकास महामंडळाचे विभागीय सल्लागार संदीप मराठे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार उत्कर्ष भोळे, महिला व बाल विकास विभागातील सखी वन स्टॉप सेंटरच्या श्रीमती खांडेकर, खउखउख चे संतोष पाटील व नारायण बंडे कऊक्रऊ बँकेचे प्रतिनिधी, तसेच माविम जिल्हा कार्यालयाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप, लेखा अधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदुरकर, चखड सल्लागार नरेश कुरापाटी, सी.एम.आर.सी. सचिव, लेखापाल, उपजीविका सल्लागार, सहयोगिनी व कार्यकारीनी सदस्य मंडळ उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संदिप मराठे व मंचावरील उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत व प्रस्तावना उचठउ व्यवस्थापक मिना कांबळे यांनी केली. वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल लेखापाल स्वप्रील वाघमारे यांनी सादर केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संदीप मराठे यांनी शासकीय योजनांची माहिती दिली तर उत्कर्ष भोळे यांनी कृषि व पशुपालनाशी संबंधित योजनांची माहिती दिली, श्रीमती खांडेकर यांनी महिला व बालविकास विभागाच्या योजनांवर मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी ऋढच् कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांचे प्रस्तावना व सादरीकरण केले.

## माजलगाव शहरातील विवान बालरुग्नालय यांनी नगरपरिषदेने दिलेल्या नोटीसकडे दुर्लक्ष करून रस्त्यावरच वाहनतळ ठेवले सुरू

- नगरपरिषद कारवाई करण्यासाठी डोळेझाक का करत आहे
- वारे वा डॅक्टर साहेब नगर परिषद ने कार्यवाईची नोटीस काढुन सुद्धा दुप्पट पार्किंग रस्त्यांवरच ऐवढी दादागीरी कशा मुळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील समता कॉलनी कडे जाणार्या रस्त्यावर विवान बालरुगनालय आहे या रुग्णालयात येणार्या रुग्णांच्या गाड्या रोडवरच पार्कींग होत असल्याने रहदारीस मोठा अडथळा निर्माण होत आहे संदर्भात नगरपरिषद माजलगाव यांच्या कडे मा सचिन जावळे यांनी तक्रार दाखल केली आहे आणि तक्रार ची दखल घेऊन नगर परिषद माजलगाव यांनी विवान बालरुगनालय यांच्या नावाने नोटीस देखील काढली आहे तरी देखील यांची पार्कींग रस्त्यावरच दिसुन येत आहे नगरपरिषद म ाजलगाव यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे या रुग्णालयाची पार्कींग ची जागा बांधकाम परवान्यामध्ये अंतर्भूत अशी सांगण्यात आलेली आहे तरी माजलगाव नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणात ताबडतोब बारकाईने लक्ष घालुन पार्कींग साठी असलेली अंतर्भूत जागा रुग्णालयाच्या निदर्शनास आणुन द्यावी कारण नगरपरिषद प्रशासनाकडे नगररचना आणि नगर विकासाचे सर्व अधिकार असुन देखील नगरपरिषद प्रशासन कारवाई का करत नाही जो पर्यंत नगरपरिषद कारवाई करणार नाही तो पर्यंत माझा लढा मी असाच चालू ठेवणार आहे जरी माजलगाव नगरपरिषदेने कार्यवाही नाही केली तर मी हायकोर्टात देखील जाणार आहे म्हणून नगरपरिषदेने या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालावे असे आवाहन सचिन जावळे यांनी केले आहे.

## ओबीसी आरक्षणावर अतिक्रमण विरोधात खरात आडगाव फाट्यावर रास्त रोको

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने हैद्राबाद गॅझेट वरुन मराठा समाजालातील कुणब्यांना ओबीसीचे प्रमाणपत्र देण्याच्या उद्देशाने शासन निर्णय / जीआर काढला आहे, म्हणुन मुळ ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अतिक्रमण केले जाणार आहे याच्या विरोधात माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव फाटा येथे १५ सप्टेंबर रोजी रास्ता रोको केला जाणार आहे. त्याबाबत प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हैदराबाद गॅजेट लागू करून मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करणारा जीआर काढला यामुळे हा ओबीसी समाजावर अन्याय करण्याचा प्रकार होत आहे तात्काळ रद्द करून मराठा समाजाकडून ओबीसीच्या आरक्षणावर होणारे अतिक्रमण तात्काळ थांबवण्यात आले पाहिजे मागण्यासाठी सकल ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने रस्ता रोको सहभागी होऊन, आपला आक्रोश शासना पर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या संख्येने रास्ता रोकोत सहभागी व्हावे असे आव्हान सकल ओबीसी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले.

## पिंपळनेर परिसरात पावसाच्या जोरदार सरी



**पिंपळनेर । प्रतिनिधी**


गणेशोत्सवात घेतलेल्या विश्रांतीनंतर वरुणराजाने बीड तालुक्यातील पिंपळनेर सह परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावली. दुपारी संततधार पाऊस पडला. तर उशिरापर्यंत पाऊस सुरूच होता. तालुक्याच्या काही ग्रामीण भागावर मात्र अजूनही पाऊस रुसलेलाच आहे. सुरुवातीला झालेल्या पावसानंतर तालुक्यात पावसाने विश्रांती घेतली होती. जिरायती भागातील शेतकरी म ोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. ऐन पावसाळ्यात शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्याची वेळ आली आहे. पाऊस होईल अशी शक्यता असतानाच पाऊस पडत नाही. हवामान विभागाने पुढील दिवसात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. दरम्यान, शनिवारी चांगला पाऊस झाल्याने पिंपळनेरकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला दिवसभर ढगाळ वातावरण आणि जोरात सुटणारा वारा यामुळे वातावरणात बदल झाला आहे. वातावरणातील बदलामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्दी, खोकला, डोकेदुखी अंगदुखीने नागरिक हैराण झाले आहेत-ऊन, थंड हवा, कोसळणाऱ्या सरी असे वातावरण सध्या पाहायला मिळत आहे.

## खा. बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नातून अपघात ग्रस्त रुग्णाला एक लाख रुपयांची मिळाली आर्थिक मदत : शरद खांडवे

### रुग्णाच्या नातेवाईकांकडून बप्पाचे आभार

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील शेतकरी भाऊसाहेब बाळासाहेब खांडवे यांच्या पत्नी कल्पना भाऊसाहेब खांडवे (वय ३८) यांचा काही दिवसापुर्वी अपघात झाला होता. वैद्यकीय उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर येथील श्री दीप हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. उपचारासाठी जास्त पैशाची गरज होती. घरची परिस्थिती बेताची असल्याने अचानक एवढी मोठी रक्कम देणे शक्य नसल्याने सामाजिक कार्यकर्ते शरद खांडवे यांनी बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांना संपर्क साधुन अपघात ग्रस्ताविषयी माहिती देत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. खा. बजरंग सोनवणे यांनी तत्परता दाखवत खांडवे कुटुंबाला वैद्यकीय उपचारासाठी एक लाख रुपयांची आर्थिक मदत मिळवून दिली.





खा.सोनवणे संकट काळात मदतीला धावून आल्याने रुग्णाच्या नातेवाईकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## अशोक दादा ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मतिमंद विद्यालयात शालेय साहित्य आणि अल्प उपहार वाटप

**बीड । प्रतिनिधी**

बीड बार्शी नाका येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले पाटील यांच्या वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचा खर्च टाळून, त्यांनी बीड येथील मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि अल्प उपहार वाटप केले.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंद तर मिळालाच, पण सम ाजातील गरजूंना मदत करण्याची प्रेरणाही इतरांना मिळाली. याप्रसंगी अशोक दादा ढोले पाटील यांनी, वाढदिवस साजरा करण्याचा खरा आनंद गरजूंना मदत करण्यात आहे, असे सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांना मदतीचा हात देता आल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

यावेळी भावी नगरसेवक सातीराम अण्णा ढोले, समाजसेवक प्रविण भाऊ पालीमकर, पत्रकार भागवत वैद्य ,संजय कुलकर्णी , लक्ष्मण नाना गायकवाड,दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेशउध्यक्ष अशोक आठवले, रोहित धुंरधरे,सचिन बोबडे,संदिप गांडगे, प्रकाश तावरे,शरद झोडगे, महेश मते,लहु गोरे,अमोल अहिरे, प्रकाश तावरे,अमोल शिंदे,अजय जाधव अंकुश गवळी, विद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, आणि इतर मान्यवर उपस्थित होते. ढोले पाटील यांच्या या कार्याबद्दल सर्वांनी त्यांचे कौतुक केले. अशाप्रकारे वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श सम ाजापुढे ठेवल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्य आणि फळांचे वाटप मिळाल्याने समाधान व्यक्त केले आणि अशोक दादांचे आभार मानले.

## पाली ग्रामपंचायतीत सरपंच व अपात्र सदस्यांचा मनमानी कारभार

### ग्रामपंचायत मध्ये अपहार करणाऱ्यावर कारवाई करा अन्यथा उपोषण..उपसरपंच वीर

**पाली । प्रतिनिधी**

पाली ग्रामपंचायतीतील सरपंच व अपात्र झालेले सदस्य दिर तसेच ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मनमानी कारभार करून प्रशासनाचे नियम धाब्यावर बसवल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायतीचे उपसरपंच महेंद्र वीर यांनी केला आहे. याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात उपसरपंच वीर यांनी म्हटले आहे की, सरपंच व सदस्य दिर यांच्याकडून ग्रामपंचायतीच्या विविध योजनांत बेकायदेशीर हस्तक्षेप केला जात असून खरेदी प्रक्रियेत अनियमितता घडवून आणली जाते.तसेच अंगणवाडी साहित्य,सिमेंट,स्ट्रीट लाईट, पाणीपुरवठा साहित्य खरेदी यांसह इतर कामांतही मोठा गैरव्यवहार होत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामपंचायतीतील निर्णयप्रक्रियेत दुर्लक्ष करून सरपंच व अपात्र झालेले सदस्य स्वतः च्या मनाप्रमाणे कामे राबवितात. यामुळे निधीचा अपहार होऊन ग्रामपंचायतीच्या कामकाजात गंभीर विसंगती निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद आहे. प्रशासनाने या प्रकाराची चौकशी करून अपहार करणाऱ्या सरपंच,अपात्र सदस्य व ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर कारवाई न केल्यास येत्या १७ सप्टेंबर मुक्ती संग्राम दिनी उपोषणास बसणार असा इशारा उपसरपंच वीर यांनी दिला आहे.